दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक २०३ वा शनिवार दि.०१ फेब्रुवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


### लातूर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या भरोसा सेल इमारतीचे पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

# लातूर पोलिसांकडून महिला, मुलींसाठी राबविण्यात येणारे उपक्रम कौतुकास्पद - पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले








लातूर :- जिल्हा पोलीस दलाच्या भरोसा सेलमार्फत करण्यात आलेल्या समुपदेशनामुळे अनेक कुटुंबे विभक्त होण्यापासून वाचली आहेत. तसेच आणि अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कक्षामार्फत जिल्ह्यातील बेपत्ता मुलींचा शोध घेवून त्यांच्या पालकांकडे सुपूर्द करण्यात येत आहे. तसेच मुलांना दामिनी पथकविषयी माहिती देण्यासाठी 'इन्स्पेक्टर दामिनी' पुस्तिका तयार करण्यात आली आहे. पोलीस विभागाचे महिला, मुलींसाठी राबविण्यात येणारे हे उपक्रम कौतुकास्पद असल्याचे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे सांगितले.

पालकमंत्री ना. भोसले यांच्या हस्ते कोनशिला अनावरण व फित कापून पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या भरोसा सेल इमारतीचे लोकार्पण झाले. या इमारतीमध्ये भरोसा सेल, अनैतिक मानवी व्यापार वाहतूक प्रतिबंधक कक्ष आणि दामिनी कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. या कक्षांची पालकमंत्री ना. भोसले यांनी पाहणी केली. तसेच येथील कामकाजाची माहिती घेतली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, उपअभियंता संजय सावंत, पोलीस उपअधीक्षक गजानन भातलवंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी रणजित सावंत यावेळी उपस्थित होते.

पती-पत्नीमध्ये किरकोळ कारणांमुळे होणाऱ्या कौटुंबिक वादावर वेळीच तोडगा निघाला नाही तर अनेकदा घटोस्फोट, एकमेकांवर गुन्हे दाखल करण्यापर्यंत वाद वाढतो. हे टाळण्यासाठी भरोसा सेलमार्फत जोडप्यांचे समुपदेशन करण्यात येत आहे. गेल्या वर्षी जवळपास ४९१ जोडप्यांमध्ये समेट घडवून आणण्यात आला आहे. त्यामुळे ही कुटुंबे विभक्त होण्यापासून वाचली आहेत. या जोडप्यांचे आईवडील, मुले यांच्या आयुष्यात येणारी संकटे यामुळे दूर झाली आहेत. या कक्षाने यापुढेही असेच संवेदनशीलपणे काम करावे, असे पालकमंत्री ना. भोसले म्हणाले.

भरोसा सेलच्या माध्यमातून वयोवृद्ध नागरिकांनाही मदत करण्यात येत आहे. तसेच अनैतिक मानवी व्यापार वाहतूक प्रतिबंधक कक्षाने गेल्या वर्षभरात जवळपास १३२ बेपत्ता मुलींना शोधून त्यांच्या पालकांकडे सुपूर्द केल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी प्रास्ताविकात सांगितले. भरोसा सेलच्या समुपदेशनाने समेट घडलेल्या जोडप्यांचा यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात पालकमंत्री ना. भोसले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच भरोसा सेल इमारतीचे बांधकाम गतीने पूर्ण केल्याबद्दल सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता संजय सावंत, कनिष्ठ अभियंता वर्षा सोनटक्के, सार्वजनिक बांधकाम विद्युत उपअभियंता दत्तात्रय इंगळे यांच्यासह कंत्राटदार यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. भरोसा सेल, अनैतिक मानवी व्यापार वाहतूक प्रतिबंधक कक्षातील अधिकारी, कर्मचारी यांचाही पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## क्रीडा संकुलातील सुविधांचे बळकटीकरण आणि स्वच्छतेला प्राधान्य द्यावे - पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

### धावपट्टीवर उडणारी धूळ रोखणे, स्वच्छतेसाठी लातूर शहर महानगरपालिकेचे सहाय्य



लातूर :- जिल्हा क्रीडा संकुल येथे येणाऱ्या खेळाडूंना चांगल्या सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या सुविधांचे बळकटीकरण करावे. स्वच्छता, धुळीवर नियंत्रणासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात. याकरिता लातूर शहर महानगरपालिकेने सहाय्य करावे, अशा सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे दिल्या.

विभागीय क्रीडा संकुल समिती आणि जिल्हा क्रीडा संकुल समितीची आढावा बैठक पालकमंत्री ना. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, प्रभारी क्रीडा उपसंचालक तथा जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांच्यासह समितीचे सदस्य यावेळी उपस्थित होते.

लतुर शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या जिल्हा क्रीडा संकुलावर येणाऱ्या खेळाडूं, नागरिकांची संख्या अधिक आहे. त्यांना चांगल्या क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत. ज्या खेळांना लातूरकरांची अधिक पसंती आहे, त्या खेळांसाठी आवश्यक सुविधा क्रीडा संकुलात उपलब्ध करून द्याव्यात. यासोबतच सध्या अस्तित्वात असलेल्या मैदानांचे बळकटीकरण, धावपट्टीची दुरूस्ती, स्वच्छता विषयक सुविधा आदी कामांना प्राधान्य द्यावे. याकरिता तातडीने करावयाच्या आणि दीर्घकालीन उपाययोजना हाती घेण्याच्या सूचना पालकमत्र्यांनी दिल्या. तातडीने करावयाच्या उपाययोजनांसाठी लातूर शहर महानगरपालिकेने सहकार्य करून क्रीडा संकुल स्वच्छता, धूळ नियंत्रणासाठी पाण्याची फवारणी करावी, असे त्यांनी सांगितले.

विभागीय क्रीडा संकुलातील पहिल्या टप्प्यातील कामांचा आराखडा तयार करण्याच्या सूचना

कव्हा येथे होत असलेल्या विभागीय क्रीडा संकुलात सपाटीकरण, रस्ते, धावपट्टी, यासोबतच इतर मूलभूत सुविधांची निर्मिती पहिल्या टप्प्यात हाती घेण्यात येईल. यासाठीचा सविस्तर आराखडा तयार करावा. याठिकाणी भविष्यात केल्या जाणाऱ्या सुविधा निर्मितीचा विचार करूनच पाहिल्या टप्प्यातील कामांचे योग्य नियोजन करावे. याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाची मदत घेवून आराखडा तयार करावा, असे पालकमंत्री ना. भोसले म्हणाले.

## ग्रामीण भागातील अनुसूचित जातीमधील कुटुंबांचे घरकुलाचे स्वप्न होणार साकार !

लातूर, दि. ३१ (जिमाका) : जिल्ह्यात रमाई आवास योजना ग्रामीण अंतर्गत नवीन ५ हजार ७६२ घरकुलांना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने मंजुरी दिली आहे. त्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील कुटुंबातील व्यक्तींचे स्वतः च्या हक्काचे पक्के घर बांधण्याचे स्वप्न साकार होणार आहे.जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय रमाई आवास योजना समितीच्या बैठकीला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

रमाई आवास योजनेसह इतर आवास योजनांमधून जिल्ह्यात उभारण्यात येत असलेल्या घरकुलांच्या कामांना गती द्यावी. घरकुलांचे प्रस्ताव स्वीकारताना प्रत्येक गरजू आणि पात्र लाभार्थ्याला घरकुल मिळेल, याची दक्षता घावी. गतवर्षी मंजूर करण्यात आलेल्या घरकुलाच्या कामांपैकी अंतिम टप्प्यातील कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करावा. गतवर्षीचे आणि यावर्षीचेही घरकुल बांधणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना पालकमंत्री ना. भोसले यांनी दिल्या.सन २०२३-२४ मध्ये जिल्ह्यात रमाई आवास योजना ग्रामीण अंतर्गत ७ हजार २८ घरकुलांना मंजुरी देण्यात आली होती. त्यापैकी २ हजार २६ घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ५ हजार २ घरकुलांचे काम प्रगतीपथावर असून यातील बहुतांश कामे अंतिम टप्प्यात असल्याचे समाज कल्याण सहायक आयुक्त श्री. चिकुर्ते यांनी यावेळी सांगितले. तसेच सन २०२४-२५ अंतर्गत प्राप्त प्रस्तावांची माहिती त्यांनी सादर केली.

## दोन दिवसीय जिल्हास्तरीय महसूल क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन




लातूर :- जिल्हास्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि अर्जुन पुरस्कार विजेत्या सारिका काळे यांच्या हस्ते झाले.

प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, शरद झाडके यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. खो-खो मधील माजी राष्ट्रीय खेळाडू असलेले महसूल कर्मचारी हनुमंत जक्कलवार यांनी उपस्थितांना क्रीडा शपथ दिली.

जिल्हास्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत सांघिक व वैयक्तिक अशा एकूण ८० क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. लातूर, निलंगा, उदगीर, अहमदपूर, औसा-रेणापूर महसूल उपविभागातून प्रत्येकी एक आणि जिल्हाधिकारी कार्यालयाची एक अशा एकूण सहा संघांमध्ये या स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी सर्व संघांचे पथसंचलन झाले. यामध्ये निलंगा उपविभागीय संघाने प्रथम क्रमांक पटकाविला, तर लातूर उपविभाग आणि उदगीर उपविभागाला अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळाला.

या स्पर्धेत खो-खो आणि हॉलीबॉलचे सामने झाले. तसेच क्रिकेटमध्ये निलंगा विरुद्ध उदगीर संघातील सामन्यात उदगीर विजयी ठरले. तसेच अहमदपूर विरुद्ध जिल्हाधिकारी कार्यालय सामन्यात जिल्हाधिकारी कार्यालय विजयी ठरले. उपांत्य सामन्यात लातूर विरुद्ध उदगीर सामना होवून यामध्ये उदगीरच्या संघाने विजय मिळविला.

# समाधानी व आनंदी राहणे हाच सुखी जीवनाचा मंत्र : माजी मंत्री आमदार संजय बनसोडे

### लिंगायत समाज स्मशानभूमीच्या सुशोभिकरणासाठी १ कोटींचा निधी





उदगीर : सद्याच्या धावपळीच्या जीवनात मनुष्य हा उदास होत आहे. धाकधकीच्या जीवनामुळे माणसाच्या आयुष्यातून समाधान निघुन जात आहे. वाढत्या गरजा आणि अपेक्षाच्या ओझ्याखाली माणूस दिवसेंदिवस असमाधानी होत आहे मात्र आपल्याला जगायला काहीच लागत नाही. थोड्या फार गरजा पुर्ण झाल्या की आपले हे आयुष्य सुखी होते. याचाच विचार करुन माणुस समाधानी व आनंदी राहिला की तो सुखी होतो हाच सुखी जीवनाचा मंत्र असल्याचे मत माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर शहरातील लिंगायत समाज स्मशानभुमी येथील महाप्रवेशव्दार, महादेव मुर्ती व कैलास धाम मधील सुशोभिकरण व लोकार्पण सोहळ्यात बोलत होते. यावेळी डॉ. शंभूलिंग शिवाचार्य महाराज, शंकरलिंग शिवाचार्य महाराज हानेगाव, सिध्दलिंग शिवाचार्य महाराज देवणी, माजी आ.गोविंद केंद्रे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे,माजी सभापती सिध्देश्वर पाटील, वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापूरे, बसवराज पाटील नागराळकर, बस्वराज बागबंदे, बसवराज पाटील कौळखेडकर, भरत चामले, मन्मथ किडे, विजयकुमार चवळे, विजयकुमार हुंडेकरी, उत्तरा कलबुर्गे, कांताबाई कलबुर्गे, चंद्रकला बिरादार, सरोजा वारकरे, शामला कारामुंगे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी, उदगीर येथील वीरशैव लिंगायत भवनासाठी साडेसात कोटी रुपये दिले. लिंगायत समाजाच्या स्मशानभुमी सुशोभिकरणासाठी एक कोटी दिले असुन विविध मंदिर, सभागृहासाठी निधी दिला. आपल्या पुढच्या पिढीवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून श्री रेणुकाचार्य संस्कार भवन आपण उभारत आहोत. भविष्यात आपल्या भागातील विद्यार्थी एमपीएससी व यूपीएससीच्या मार्फत उच्च पदावर जावे म्हणून सर्व समाजातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासिकेसाठी निधी उपलब्ध करून देणार आहे. कारण आपल्या समाजाची प्रगती ही फक्त शिक्षणामुळेच होत असल्याचे आमदार संजय बनसोडे यांनी सांगितले. यावेळी लिंगायत समाजातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय....

# लियांग वेनफेंग

सध्या एका चिनी तरुणाने अख्ख्या अमेरिकेची झोप उडवली आहे. या तरुणाने बनवलेल्या स्वस्त आणि मस्त अशा एका एआय अॅपने बड्या अमेरिकन कंपन्यांचे अब्जावधी रुपयांचे नुकसान केले. या तरुणाचे नाव लियांग वेनफेंग आणि त्याने बनवलेल्या एआय मोबाईल अॅपचे नाव 'डीपसीक'. या अॅपमुळे सध्या अमेरिकेतील शेअर बाजारात जणु भूकंपच झाला आहे. सोमवारी डीपसीक लाँच झाल्यानंतर अमेरिकेतील 'एनविडिया' कंपनीचे शेअर्स चार महिन्यांतील नीचांकी स्तरावर पोहोचले. कंपनीचे तब्बल ६०० अब्ज डॉलर्सचे नुकसान झाले. त्यामुळे अमेरिकेतील टेक कंपन्यांचा वरचष्मा असलेल्या नॅसडॅक शेअर बाजारात तीन टक्क्यांहून अधिक घसरण झाली. यामध्ये प्रामुख्याने मेटा, गुगल, अॅपल, एनवीडिया, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांना सर्वात मोठा फटका बसला आहे.

'डीपसीक' हे चीनचे अद्ययावत 'एआय' मॉडेल आहे. चीनची सिलिकॉन व्हॅली म्हटल्या जाणार्या हँगझोऊ येथील 'डीपसीक' नावाच्या कंपनीत ते विकसित करण्यात आले. या कंपनीची स्थापना २०२३ मध्ये लिआंग वेनफेंग या चिनी एआय इंजिनिअरने केली. सोप्या भाषेत सांगायचे, तर हे 'डीपसीक' म्हणजे 'ओपन एआय'च्या 'चॅट जीपीटी'चा चिनी पर्याय आहे; मात्र यात सर्वात मोठा फरक म्हणजे चॅट जीपीटीपेक्षा अतिशय कमी खर्चात हे तंत्रज्ञान उभे केले आहे. अॅपलच्या अॅप स्टोअरवर डीपसीकचे मोबाईल अॅप मोफत डाऊनलोड करून घेता येते. ते चॅट जीपीटीप्रमाणेच विचारलेल्या बाबींवर माहिती पुरवते; मात्र त्यासाठी ते अत्यंत कमी सामग्रीत व पर्यायाने कमी खर्चात काम करते. त्यामुळे सध्याच्या प्रचलित एआय मॉडेलसाठी लागणारी खर्चिक सामग्री, चिप व अन्य तंत्रज्ञानाची गरज मोठ्या प्रमाणात घटली. त्यामुळे चिपसारखी अशी सामग्री तयार करणार्या एनवीडियासारख्या कंपन्यांना याचा मोठा फटका बसला. हे 'डीपसीक' बनवणारे लियांग अवघ्या ४० वर्षांचे आहेत.

लियांग यांचा जन्म चीनच्या झानजियांग राज्यात झाला. त्यांचे वडील प्राथमिक शाळेत शिक्षक होते. लहानपणापासूनच हुशार, चौकस विद्यार्थी असलेल्या लियांग यांना नव्या गोष्टी शिकण्याची धडपड होती. चीनच्या झोजियांग विद्यापीठातून २००७ मध्ये त्यांनी 'आयटी इंजिनिअरिंग'मध्ये पदवी घेतली. २०१० मध्ये त्यांनी आयटी इंजिनिअरिंगचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्यांनी रिसर्च मॅनेजमेंटच्या दरम्यान टार्गेट ट्रॅकिंग अल्गोरिदम शोधले होते. त्याचा कमी खर्चातील पीटीझेड कॅमेर्यात वापर केला जातो. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी एआयशी संबंधित अनेक कंपन्यांची स्थापना केली. त्यामध्ये हांग्जो याकेबी इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट कंपनी, झोजियांग जियुझांग अॅसेट मॅनेजमेंट कंपनी, हायफ्लायर एआय यांचा समावेश होतो. २०२३ मध्ये त्यांनी स्थापन केलेल्या 'डीपसीक'चे ते स्वतः सीईओ आहेत. विचित्र केशरचना, चष्मा असलेल्या या तरुणाकडे सुरुवातीला कोणी गांभीर्याने पाहत नव्हते; मात्र आता याच तरुणाचा जगभर बोलबाला आहे.

# दावे फोल



महाकुंभमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत ३० जणांना प्राण गमवावे लागले. हा सरकारी आकडा असल्यामुळे त्यावर विश्वास ठेवण्याशिवाय पर्याय नाही. कदाचित ही संख्या जास्त असू शकते. मुद्दा हा आहे की एवढे लोक एकाच ठिकाणी एकाच वेळी मृत्युमुखी पडले ते कोणत्या नैसर्गिक आपत्तीमुळे नाहीत, तर मानवी गलथानपणामुळे. हा गलथानपणा तेथील प्रशासनाचा आहे तेवढाच भाविकांचा आहे.

भाविकांच्या श्रद्धेला बोल लावण्याचे कारण नाही. मात्र, भाविकांनीही जरा संयम बाळगत कृती केल्या आणि जबाबदारीने वागण्याचा प्रयत्न केला तर अशा अनेक घटना टाळता येऊ शकतात. तथापि, धार्मिक ठिकाणी गेल्यावर भाविकांचा संयम संपतो. ते भगवंताच्या चरणी लीन होण्यासाठी एवढे उतावीळ होतात की त्यांचा इहलोकाचा प्रवास संपवत परलोकाचीच ते वाट धरतात. त्यांच्या पातळीवर जसा हा अतिश्रद्धा आणि अति उतावळेपणा त्यांच्यासकट अन्य सर्वांना जाचदायक ठरतो तसाच प्रशासनाचा गलथानपणाही अंतिमतः मुळावर उठतो.

कुंभमेळ्यात बुधवारी झालेली घटना पहिली आणि एकमेव नाही. सातत्याने अशा घटना घडत आल्या आहेत. त्यात चाळीस-पन्नास लोकांचा बळी जातो आणि काही क्षणांची हळहळ व्यक्त करून मागच्या पानावरून पुढे सुरू राहते. कुंभ दुर्घटनांमध्ये आतापर्यंत झालेल्या एकूण मृत्यूंचा आकडा काढायचा झाला, तर तो हजाराच्या वर जातो. त्यातून धडा काय घेतला याचा विचार करायची वेळ येते तेव्हा उत्तर शून्य हेच असते. प्रत्येक वेळी केलेल्या मोठमोठ्या दाव्यांच्या विपरीत कुठेतरी काहीतरी त्रुटी राहिलेलीच असते. कुठे ढिसाळपणा तर कुठे अंगवळणी पडलेला बेशिस्तपणा असतो.

महाकुंभ सुरू होण्यापूर्वीच त्याची प्रचंड प्रसिद्धी झाली होती. मुळात महाकुंभ हा असा प्रकार आहे की हिंदू धर्मीयांना त्याचे वेगळे महत्त्व जाहिरातबाजी करून सांगण्याची गरज नाही. त्यातही मौनी अमावास्येला आणि अन्य वेळा होणारे पवित्र स्नान आणि त्याचे धार्मिक महत्त्व हे जुन्याजाणत्या लोकांपासून ते आजच्या सोशल मीडियाच्या पिढीपर्यंत सगळ्यांनाच चांगलेच ठाऊक आहे. दर कुंभमेळ्याला मग तो प्रयागराजचा असो अथवा नाशकातील तेथे लाखोंच्या नव्हे तर करोडोंच्या संख्येने भाविक येतात. आताही प्रयागराज महाकुंभला ४० कोटी भाविक येणार अशी वदंता होती व ते खरेही आहे.

जर एवढी गर्दी होणार आहे, तर त्याचे नियोजन त्या प्रकारचे झाले आहे का, याचा विचार कोणी करायचा. दुर्घटना घडल्यावर प्रत्येक वेळी तत्कालीन कारण पुढे केले जाते. अचानक गर्दी उसळली किंवा भाविकांनी अचानक धाव घेतली वगैरै सांगितले जाते. तेवढे सांगून गेलेले जीव परत येत नाहीत. गर्दी होणारच आहे व तिचा अंदाजे आकडा किती असेल याची आपल्याला अगाऊ कल्पना असून आपणच ती संख्या कौतुकाने सांगत असू तर एवढ्या लोकांचा प्रवास सुकर आणि सुखरूप होईल इतपत आपली यंत्रणा सक्षम आणि सज्ज आहे का, याचा अदमास कसा लागत नाही.

गर्दीचे योग्य व्यवस्थापन करण्यात यंत्रणा कमी पडली हा एकच निष्कर्ष दुर्घटना घडल्यावर काढता येतो. कुंभमेळ्याच्या ठिकाणीच काही दिवसांपूर्वी आग लागल्याची घटना घडली. त्याची फारशी चर्चा झाली नाही. भीतीचे वातावरण पसरू नये किंवा अफवांचे पेव फुटू नये म्हणून ही खबरदारी घेतली असेल. कालही घटना घडल्यानंतर तब्बल १७ तासांनी किती लोकांचा मृत्यू झाला व किती जण नेमके जखमी झाले हे सांगण्यात आले. लगेचच आकडा जाहीर केला असता तर कदाचित अधिक हानी झाली असती हेही समजून घेता येते.

मात्र पहिल्यांदाच जेव्हा आगीची घटना घडली तेव्हा त्रुटी राहिल्या आहेत याचा तो ट्रेलर होता याची जाणीव तेव्हा झाली नव्हती का? ती जर झाली असती तर मौनी अमावास्येची संभाव्य गर्दी ध्यानात घेऊन योग्य तयारी केली गेली असती किंवा करता येऊ शकली असती. एक गोष्ट लक्षात घेण्याची गरज आहे ती म्हणजे महाकुंभ असल्यामुळे शहर आणि नदीचा परिसर काही विस्तारणार नाही. तो जेवढा आहे तेवढाच राहणार आहे व गर्दीचा जेवढा भार सोसण्याची त्याची क्षमता आहे तीही तेवढीच राहणार आहे.

अचानक संपूर्ण शहराच्या लोकसंख्येच्या पाचपट किंवा सहापट गर्दी तेथे अवतरली तर एवढ्या लोकांना सामावून घेणार तरी कसे? रेल्वे, बस, विमान, खासगी वाहने अशा सर्वच माध्यमातून प्रयागराजकडे गर्दीचा ओघ सुरू आहे. महामार्गही तुंबले आहेत. तेथे अडकलेल्या प्रत्येकाला वेगवेगळ्या अडचणींचा सामना करावा लागला. देशाच्या कानाकोपर्यातून ही गर्दी आली आहे. लोकांनीही संभाव्य स्थितीचे आकलन करूनच धाव घेतलेली बरी असते. केवळ कुंभमेळ्याच्याच ठिकाणी नाही तर अन्य सर्वच धार्मिक ठिकाणांनाही हे लागू होते व सगळ्यात महत्त्वाचे असते ते म्हणजे संयम आणि स्वयंशिस्त. भारतातील धार्मिक ठिकाणी होणार्या दुर्घटनांबाबत कायम एकच सत्य आहे की त्या ठिकाणी पोहोचल्यावर जो गोंधळ तेथे पाहायला मिळतो तो श्रद्धेसोबत सबुरी ठेवल्यावरच दूर करता येऊ शकतो. तो वैयक्तिक पातळीवरच करता येईल, प्रशासनाकडून अपेक्षा ठेवण्यात अर्थ नाही.


# माणसातला देव माणूस म्हणजे सुरेश आण्णा धस..!

तो काळ अजूनही आठवला तरी अंगावरती शहारे येतात. तो काळ म्हणजेच २००५-६ चा होता. अण्णा नुकतेच भारतीय जनता पार्टी पक्षाला सोडून राष्ट्रवादीत आले होते. अण्णांच्या जवळचे बरेच कार्यकर्ते, अण्णांना सोडून गेली होते.

त्यावेळेस मी नुकताच इयत्ता १० वी मधून,११ वी मध्ये गेलो होतो, साधारण वार बुधवार दिनांक १४ सप्टेंबर २००५ होता. अचानक माझ्या वडिलांच्या छातीमध्ये चमक निघण्यास सुरुवात झाली होती. तसे माझे वडील खुप भित्रे व हावळ्या मनाचे होते. तस पाहिल तर त्यावेळेस आमच्या गावामध्ये, स्थानिक डॉक्टर नव्हते. त्यामुळे माझे वडील करंजी घाट येथील, डॉक्टर पालवे यांच्याकडे गेले होते तेव्हा डॉक्टर पालवे यांनी वडिलांची पूर्ण तपासणी केली. तपासणी अंती माझ्या वडिलांना अहिल्यानगर येथील डॉ. सानप यांच्याकडे उपचार घेण्यासाठी सांगितले व तसे पत्र दिले. माझ्या वडिलांना तात्काळ अहिल्यानगर येथे डॉ. सानप यांच्याकडे उपचार घेण्यासाठी जाण्याचा सल्ला दिला.

दुसऱ्या दिवशी माझे वडील, व आजोबा दोघेजण अहिल्यानगरच्या हृदयरोग तज्ञ डॉ. सानप यांच्याकडे गेले असता. डॉ.सानप यांनी हृदयाची पूर्ण तपासणी करून, तपासणी अंती वडिलांना सांगितले की, तुमचे दोन्हीही वाल निकामी झाले आहेत. त्यामुळे तुम्हाला तात्काळ ऑपरेशन करावे लागेल. व ऑपरेशनला साधारण ४ ते ५ लाख रुपये एवढा खर्च येईल असे सांगितले डॉक्टरांचे हे बोलणे वडिलांच्या कानावर पडताच, वडिलांच्या पायाखालची जणू मातीच सरकली. वडिलांना काय?करावे व कसे करावे हे सुचतच नव्हते. कारण ऑपरेशनसाठी साधारण ४ ते ५ लाख रुपये एवढा खर्च येणार असल्यामुळे, एवढा पैसा कुठून उपलब्ध करायचा, हा मोठा प्रश्न वडीलांच्या समोर उभा होता.

वडील काहीतरी विचार करत होते.तेवढ्यात डॉक्टरांनी पुढचा प्रश्न केला. तुम्हाला आजच्या आज ऍडमिट व्हावे लागेल. तुम्ही आज ऍडमिट झाले नाही तर तुमच्या आयुष्यातील फक्त दोनच दिवस शिल्लक राहिले आहेत असे समजावे. डॉक्टरांनी आपल्या उजव्या हाताचे दोन बोट दाखवीत, वडिलांना सूचक इशारा केला. तस पहिल्यापासूनच माझ्या आजोबांना ऐकायला कमी येत असे परंतु डॉक्टर आणि वडिलांमध्ये काय संभाषण चालू आहे, हे माझ्या आजोबांना काय? समजणार होत. परंतु डॉक्टरांनी वडिलांना जे उजव्या हाताचे दोन बोटे दाखविले, कदाचित माझ्या आजोबांनी त्या दोन बोटाचा अर्थ २ हजार रुपये लावला असावा कारण डॉक्टरांना माझे आजोबा म्हणाले की, आम्ही कुठूनही २ हजार रुपये आणू परंतु डॉक्टर तुम्ही माझ्या मुलाला नीट करा. डॉक्टरांनी माझ्या आजोबांच्या बोलण्याकडे साप दुर्लक्ष केल होते. वडिलांना डॉक्टर म्हणाले की, तुम्ही आत्ताची आत्ता ऍडमिट व्हा आपल्याकडे वेळ शिल्लक नाही. परंतु वडीलांकडे पैसे नसल्यामुळे वडील ऍडमिट राहू शकले नाहीत. माझे वडील संध्याकाळी घरी आल्यानंतर आम्हाला ही बातमी समजली बातमी समजल्यानंतर ज्याप्रमाणे आकाशामध्ये



वीज चमकावी त्याप्रमाणे आमच्या काळजामध्ये धसकण...... झाल. कारण ५ लाख रुपये कुठून आणायचे हा मोठा प्रश्न? आमच्या कुटुंबावर त पडला होता. कारण त्यावेळेस आमची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे आम्हाला हे ५ लाख रुपये जमवणे शक्य नव्हते. त्यावेळेस मला कळाले की, सुखात सर्व माणसे सोबत येतात परंतु दुःखात कोणीच सोबत राहत नाही. जो दुःखात साथ देतो तोच आपला असतो.त्यावेळेस आमच्या देऊळगाव घाटचे सरपंच संभाजी मस्के हे होते. त्यांना ही बातमी समजल्यावर त्यांनी आमच्या कुटुंबीयांना एक प्रकारे आधार देण्याच काम केल. तुम्ही काही घाबरू नका सर्व काही ठीक होईल. आपण सुरेश आण्णा धस यांच्याकडे जाऊ असा शब्द दिला व आम्हाला त्यांनी आधार दिला. त्यावेळेस प्रथम मी अण्णा हा शब्द ऐकला होता. आम्ही तिसऱ्याच दिवशी अण्णांकडे गेलो व अण्णांना सर्व हकीगत सरपंचानी सांगितली. अण्णांनी क्षणाचाही विचार न करताच आपल्या पि.ए.ला ५ लाख रुपयाचे पत्र आमदार फंडातून देण्याचे सांगितले. त्यावेळेस आण्णांचे पी.ए पवार हे होते. अण्णांनी आम्हाला ५ लाख रुपयांचे पत्र तात्काळ दिले. त्यामुळे माझ्या वडिलांचे ऑपरेशन, आनंद ऋषी हॉस्पिटल अहिल्यानगर येथे मोफत होऊ शकले.

ज्या डॉक्टरांनी माझ्या वडिलांना २ दिवसांची मुदत दिली होती, तेच माझे वडील पुढे १७ वर्षे जगू शकले, ते फक्त आणि फक्त सुरेश अण्णा मुळेच. आम्ही हे अण्णांचे उपकार कधीच विसरू शकणार नाहीत. कारण माझ्या वडिलांना जे १७ वर्षाचे आयुष्य हे बोनस म्हणून मिळाले ते फक्त आणि फक्त सुरेश आण्णा मुळेच मिळाले. मित्रांनो मला जर कोणी विचारल की, तू देव बघितला का ? तर माझ उत्तर एकच असेल की, मी देव बघितला नाही, परंतु माणसांतला देव माणूस हा सुरेश आण्णाच्या रूपाने नक्कीच बघितला आहे.

....................................

आदिनाथ माणिक ठोंबरे.
देऊळगाव घाट.
बीड.
मो.नं.७६२०८९०२९९

# 'या' वयात लग्न कराल तर वैवाहिक जीवनात व्हाल खुशाल, स्टडीत झाला खुलासा



आयुष्यात अनेक सोनेरी क्षण येतात, त्यापैकीच एक मोलाचा आणि आठवणीत राहणारा क्षण म्हणजे लग्न. लग्नात फक्त दोन व्यक्ती एकत्र येत नसतात, तर दोन कुटुंब देखील एकत्र येत असतात. एखाद्या घरात लगीनघाई असेल तर त्या घरातील वातावरण प्रफुल्लीत होऊन जाते. पण अनेक जणांच्या मनात लग्नाबाबत एक सामान्य प्रश्न नेहमीच घुटमळत असतो. तो म्हणजे लग्न करण्याचे योग्य वय कोणते?

खरंतर बदलत्या काळ आणि वातावरणानुसार, लग्नासाठी वयोमर्यादा वाढत आहे. पूर्वी मुलींचे लग्न १४ व्या वर्षी होत असे, आज मुली ३० वर्षांच्या होईपर्यंत लग्न करत नाहीत. तसेच पूर्वी लहान वयातच मुलामुलींची लग्न होत असत पण आता प्रत्येकाला लग्न कोणत्या वयात करावे हा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे.

काही वेळा असेही मानले जाते की लवकर लग्न केल्याने जीवन आनंदी होते. परंतु काही स्टडी आपल्याला लग्नाचे नवीन पैलू आणि त्याचे यश समजून घेण्यास मदत करू शकतात. स्टडीत असे आढळून आले की २८ ते ३२ हे लग्नासाठी योग्य वय आहे. जोडीदार एकमेकांना चांगल्या प्रकारे समजून घेण्यास सक्षम असतात. त्यातही ४० नंतर लग्न केल्याने घटस्फोटाची शक्यता कमी होते.

लग्नाबाबत स्टडी काय म्हणते?

युटा विद्यापीठातील समाजशास्त्रज्ञ निक वुल्फिंगर यांनी २००६-२०१० आणि २०११-२०१३ या कालावधीतील नॅशनल सर्व्हे ऑफ फॅमिली ग्रोथ या सर्वेक्षणातील डेटाचे विश्लेषण केले. यानुसार, २८ ते ३२ वर्षांच्या दरम्यान लग्न करणाऱ्या जोडप्यांना घटस्फोटाचा धोका कमी असतो, विशेषतः पहिल्या ५ वर्षांत. या वयात, लोकांमध्ये त्यांच्या जीवनाबद्दल जबाबदारी आणि समजूतदारपणा विकसित झाला असतो, ज्यामुळे नातेसंबंध मजबूत होण्यास मदत होते.

घटस्फोटाची संभावना कधी वाढते?

वुल्फिंगरच्या अभ्यासानुसार, जसजसे तुम्ही मोठे होता तसतसे घटस्फोटाची शक्यता कमी होते, परंतु ३२ वर्षांच्या वयानंतर, ही शक्यता पुन्हा वाढू लागते. ३२ वर्षांनंतर घटस्फोटाचे प्रमाण दरवर्षी ५% ने वाढते, विशेषतः जेव्हा लोक तीसच्या उत्तरार्धात आणि चाळीशीच्या सुरुवातीला असतात. या वयात, नात्यात तणाव आणि तडजोडीचा अभाव असू शकतो, ज्यामुळे घटस्फोटाचा धोका वाढण्याची भीती आहे.

मग लग्नाचे योग्य वय काय?

समाजशास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की लग्नासाठी सर्वोत्तम वय हे २८ ते ३२ आहे. या वयापर्यंत, व्यक्तीला त्याचे वैयक्तिक जीवन, जबाबदाऱ्या आणि गरजा समजल्या असतात. तसेच ते आर्थिकदृष्ट्या स्थिर देखील असतात. म्हणून कुटुंब सुरू करण्यासाठी हा काळ योग्य मानला जातो. इतकेच नाही तर या वयात जोडपे एकमेकांशी चांगले समन्वय साधू शकतात.

या वयात लग्न करणारे घेत नाही घटस्फोट

मेरीलँड विद्यापीठाचे समाजशास्त्रज्ञ फिलिप कोहेन यांनी देखील एक अभ्यास केला, ज्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की ४५ ते ४९ वयोगटात लग्न केल्याने घटस्फोटाची शक्यता कमी होऊ शकते. त्यांचा असा विश्वास आहे की मोठ्या वयात लग्न केल्याचा असा अर्थ नसतो की हे नाते जास्त काळ टिकणारच नाही. खरंतर, या वयात दोघेही अधिक हुशार आणि प्रौढ असतात, ज्यामुळे नाते टिकवून ठेवण्यास मदत होते.

# लठ्ठपणामुळे त्रासले आहात? 'हा' घ्या मंत्र, अनेक अभिनेतेही करतात फॉलो

अभिनेता अक्षय कुमार यांनी काही वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घेतलेली मुलाखत चर्चेत होती. आता त्यांनी पंतप्रधान मोदींचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे, ज्यामध्ये मोदींनी फिटनेस आणि आरोग्याबाबत महत्वाच्या गोष्टी सांगितल्या आहेत. या पोस्टसोबत अक्षय कुमार यांनी काही टिप्सही दिल्या आहेत ज्याद्वारे स्वतःला कसे फिट ठेवता येईल याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले आहे.


लठ्ठपणाची समस्या आणि उपाय

या व्हिडीओमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात, आपण सर्वजण फिटनेसचे महत्त्व समजतो, पण मी आज एक मोठ्या समस्येबाबत बोलू इच्छितो. आपल्याकडे लठ्ठपणाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. याचा त्रास तरुणांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच होत आहे. ही चिंतेची बाब आहे कारण लठ्ठपणामुळे डायबेटीस, हृदयविकार यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढते.


फिटनेस मंत्र

पंतप्रधान मोदींनी या समस्येवर उपाय सांगताना लोकांना दोन महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले आहे - व्यायाम आणि संतुलित आहार. त्यांनी सांगितले, दररोज थोडा वेळ काढून चालणे, वर्कआउट करणे किंवा कोणतीही शारीरिक क्रिया करा.

तेलाचा वापर कमी करा आहाराबाबत बोलताना मोदी म्हणाले, आपल्या जेवणात अनहेल्दी फॅट कमी करा. जसे घरात दरमहा दोन लिटर तेल वापरत असाल, तर त्यात १० टक्के कपात करा. आपल्या जीवनशैलीत असे छोटे बदल मोठे परिणाम घडवू शकतात. त्यांनी ताजी आणि नैसर्गिक अन्न खाण्याचे महत्त्वही अधोरेखित केले. अक्षय कुमार यांनीही पंतप्रधान मोदींच्या फिटनेस टिप्सना पूरक सल्ला दिला आहे. त्यांनी म्हटले आहे की, आरोग्य हेच सर्वकाही आहे आणि निरोगी जीवनशैलीसाठी काही महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष देणे गरजेचे आहे. त्यांनी लठ्ठपणावर मात करण्यासाठी पुरेशी झोप घेणे, सकाळची ताजी हवा मिळवणे, शरीराला आवश्यक तेवढा सूर्यप्रकाश घेणे यावर भर दिला आहे. याशिवाय अन्नात कमी तेलाचा वापर करणे आणि शक्यतो देशी घी वापरून बनवलेले पौष्टिक पदार्थ खाणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अक्षय कुमार म्हणतात की, कोणताही व्यायाम करा, मग तो चालणे असो, जॉगिंग असो किंवा जिममधील वर्कआउट असो, पण तो नियमित करणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते, नियमित व्यायामाच्या सवयीमुळे केवळ शारीरिक आरोग्य सुधारत नाही तर मानसिक स्थैर्यही मिळते. त्यामुळे तुमचे जीवन सकारात्मक दिशेने बदलू शकते. तर आता या फिटनेस मंत्राचा अवलंब करून स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्या आणि एक आनंदी, निरोगी



# तुम्हालाही घाईघाईत लवकर जेवण्याची सवय आहे का? १० मिनिटांत जेवण्याचा आरोग्यावर काय परिणाम होतो? आजच जाणून घ्या





अनेकदा लहानपणी तुम्ही तुमच्या वडिलांकडून ऐकले असेल की हळूहळू खा. पण असे अनेक लोक आहेत ज्यांना हे नीट समजत नाही आणि मोठे झाल्यावरही झपाट्याने खाण्याची सवय लागते. अनेकदा कामाच्या गडबडीत अथवा घाईघाईत आपण पटापट जेवण उरकतो. अनेकांना आपल्या आयुष्यात एकदम घाईघाईत आणि पटकन जेवण्याची सवय असते. असे अनेक लोक आहेत जे जेवण समोर येताच त्यावर तुटून पडतात. तथापि, काही लोक बळजबरीने अन्न पटकन खातात.

कोणाला वेळ नसेल तर तो पटकन काहीही खातो आणि घराबाहेर पडतो. कारण काहीही असो, जर तुम्हाला झटपट किंवा घाईघाईने खाण्याची सवय असेल तर ते तुमच्या आरोग्यासाठी चांगले नाही. यामुळे अनेक प्रकारचे नुकसान होऊ शकते. सर्वप्रथम, तुम्हाला अन्नातून योग्य पोषक तत्व मिळत नाहीत ज्यामुळे तुमचे शरीर अशक्त आणि थकल्यासारखे वाटू लागते. एवढेच नाही तर यामुळे तुमची पचनक्रिया नेहमीच खराब राहते. घाईघाईत जेवण्याची सवय आपल्या आरोग्यासाठी अनेक तोटे निर्माण करत असते. याचा आपल्या आरोग्यावर काय परिणाम होतो ते जाणून घेऊयात.

खराब पचनशक्ती

क्लीव्हलँड क्लिनिकच्या मानसशास्त्रज्ञ डॉ. लिझली हेनबर्ग म्हणतात की, खूप जलद खाण्याचा पहिला प्रतिकूल परिणाम हा खराब पचन असतो. अन्न नीट चघळले की पचनाचे अर्धे काम होते. परंतु जेव्हा तुम्ही ते थेट गिळले किंवा ते कमी चावून खाल्ले जाते तेव्हा तुमच्या पोटाला हे अन्न तोडण्यासाठी खूप कष्ट करावे लागतात. त्यामुळे पचनशक्तीवर परिणाम होतो.

पोषक तत्वांच्या सेवनात अडथळा आणणे

जेव्हा आपण खूप जलद जेवण करतो, तेव्हा हे स्पष्ट आहे की अन्न योग्यरित्या तोडले जात नाही. जेव्हा ते योग्यरित्या तोडले जात नाही, तेव्हा त्यातून पोषकद्रव्ये योग्यरित्या बाहेर पडत नाहीत. त्यामुळे अन्नामध्ये असलेले सूक्ष्म पोषक घटक शरीराला मिळत नाहीत. म्हणजेच, आपल्या आहारातून आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजे न मिळताच, हे अन्न शरीराबाहेर कचरा म्हणून फेकले जाते.

मेटाबॉलिक सिंड्रोम

जर तुम्ही वेगाने खाण्याची सवय सोडली नाही तर यामुळे तुम्हाला मेटाबॉलिक सिंड्रोम होऊ शकतो. यामध्ये तुम्हाला एकाच वेळी अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागेल. यामध्ये उच्च रक्तदाब, उच्च रक्तातील साखर, पोटाजवळ जास्त चरबी, उच्च कोलेस्टेरॉल अशा समस्या एकत्रितपणे उद्भवतील. या सर्वांमुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका देखील वाढू शकतो.

वजन वाढणे

संशोधनात असे आढळून आले आहे की जलद वेगाने खाल्ल्याने आपले वजनात वाढ होऊ शकते. जपान युनिव्हर्सिटीने ५० हजार लोकांवर केलेल्या अभ्यासात असे आढळून आले की, लवकर जेवण्याची सवय असलेल्या बहुतेक लोकांचे वजन हे जास्त आहे.

ही सवय कशी बदलावी?

तुम्ही खाण्याच्या वेळेला महत्त्व द्याल असे आधीच ठरवून ठेवा. जेवणासाठी किमान २० मिनिटे द्यावीत. अर्ध्या तासाचा वेळ आदर्श मानला जातो. अन्न खाताना, ते थेट गिळू नका ते चघळण्यासाठी जास्त वेळ घ्या. तुम्ही अन्न जितके चघळाल तितके अन्नातील पोषक घटक तुमच्या शरीराला मिळतील. जर तुम्हाला पटकन खाण्याची सवय असेल, तर मध्येच पाणी प्यायला ठेवा. तुम्ही टीव्ही किंवा मोबाईल बघत जेवण करत असाल तर ही सवय देखील सोडा. या सर्व गोष्टी केल्याने तुम्हाला हळूहळू खाण्याची सवय लागेल.

# रोज ७ दिवस पुरुषांनी करावे कच्च्या लसणाचे सेवन, ५ आजारांपासून मिळणार सुटका

लसूण ही घरगुती मसाल्याच्या पदार्थ म्हणून वापरली जाते. तथापि, बरेच लोक ते खाणे टाळतात कारण ते खाल्ल्यानंतर तोंडातून दुर्गंधी येते. प्रामुख्याने जेव्हा तुम्ही कच्चा लसूण खाता तेव्हा त्यातून दुर्गंधी येते. पण तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की जर तुम्ही नियमितपणे कच्चा लसूण खाल्ला तर तुमच्या अनेक समस्या दूर होऊ शकतात. प्रामुख्याने कच्चा लसूण खाल्ल्याने पुरुषांच्या आरोग्यासाठी अनेक फायदे होऊ शकतात. पुरुषांसाठी कच्चा लसूण खाण्याचे काय फायदे आहेत ते जाणून घेऊया. डाएटिशियन दिक्षा दाभोळकरने कच्च्या लसणाचे फायदे आपल्याला सांगितले आहेत

पुरुषांमध्ये रक्तदाब वाढण्याच्या तक्रारींचे प्रमाण जास्त असते. अशा परिस्थितीत लसूण खाणे त्यांच्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. अभ्यासातून असे आढळून आले आहे की उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांसाठी लसूण फायदेशीर आहे. जर तुम्ही दररोज लसणाच्या चार पाकळ्या खाल्ल्या तर तुमच्या समस्या बऱ्याच प्रमाणात कमी होऊ शकतात.

हार्ट हेल्थ सुधारते

लसूण खाल्ल्याने हृदयाचे आरोग्य खूप सुधारू शकते. खरं तर, लसणाच्या पाकळ्यांमध्ये एलडीएल कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्याची क्षमता असते. हे रक्तवाहिन्यांमधील अडथळा दूर करू शकते. जर तुम्ही दररोज लसूण खाल्ले तर ते तुमच्या हृदयाचे आरोग्य मोठ्या प्रमाणात सुधारू शकते.

कमकुवत प्रतिकारशक्ती वाढेल

लसूण आपल्या शरीराचे हानिकारक मुक्त रॅडिकल्सपासून संरक्षण करू शकते. हे मुक्त रॅडिकल्स डीएनएला नुकसान पोहोचवू शकतात. याशिवाय, लसणामध्ये झिंक आणि व्हिटॅमिन सी देखील असते, जे संसर्गाशी लढण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करू शकते.

लसूण लैंगिक आरोग्य सुधारते

अभ्यासातून असे दिसून आले आहे की लसणामध्ये ॲलिसिन

# बाबासाहेबांनी पत्रकारिता करतांना मोफत शिक्षणाला महत्व दिले - सागर तायडे

## मुकनायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर पत्रकार दिन सोहळा उत्साहात संपन्न. ग्रामीण भागातील पत्रकारांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



वाशिम/ प्रतिनिधी :- विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एक जात, एक धर्म म्हणून कधीच कार्य केले नाही. त्यांचे कार्य सर्वसमावेशक होते. कामगार आणि मजूरांसाठी त्यांनी मराठवाड्याच्या दुर्गम भागात शिक्षण संस्था काढल्या. त्यांनी सुरु केलेले मुकनायक हे वृत्तपत्र प्रेरणादायी आणि लक्षवेधी होते. पत्रकारीता करत असतांना त्यांनी शिक्षणाला आरोग्याला महत्व दिले. सर्वच घटकांना मोफत शिक्षण व आरोग्य मिळावे हा त्यांचा आग्रह होता असे प्रतिपादन कामगार नेते तथा जेष्ठ पत्रकार सागर तायडे यांनी केले.

स्थानिक पाटणी कमर्शियल मधील चिंतामणी हॉलमध्ये मूकनायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर पत्रकार दिनाचा सोहळा जिल्हाभरातुन आलेल्या पत्रकारांच्या भरगच्च उपस्थितीत शुक्रवार,३१ जानेवारी रोजी पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष पत्रकार विनोद तायडे व स्वागताध्यक्ष अनिल ताजणे हे होते. तर मंचावर हृदयरोगतज्ञ डॉ.सिद्धार्थ देवळे,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अनिल कावरखे,जेष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे,कामगार नेते सागर तायडे मुंबई,स्त्रीरोग तज्ञ डॉ. तुषार गायकवाड, माजी जि.प.सदस्या सौ.कल्पना राऊत, नारी शक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा संगीता इंगोले, म. रा. पत्रकार संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमाणी, मेडशी ग्रा.पं. सरपंच शेख जमीर शेख गणिभाई, दलित मित्र गोपाळराव आटोटे, व्हॉईस ऑफ मिडियाचे जिल्हाध्यक्ष भागवत मापारी, साप्ताहिक माध्यम प्रतिनिधी संदीप पिंपळकर, संघमित्रा धम्मसेवा महिला मंडळ अध्यक्षा प्रतिभाताई सोनोने, समाजसेविका वैशाली खोब्रागडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून पिरिपाचे जिल्हाध्यक्ष दौलतराव हिवराळे, रिपाइंचे जिल्हाध्यक्ष तेजराव वानखडे, ॲड.संजय इंगोले, कास्ट्राईब कर्मचारी संघटना जिल्हाध्यक्ष हेमंत तायडे, सुधाकर पखाले आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी आयोजन समितीच्या वतीने प्रमुख पाहूण्यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. त्यानंतर आंबेडकरी चळवळीतील पत्रकार आणि समाजसेवकांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये पत्रकार फुलचंद भगत, विशाल राऊत, सिद्धांत जुमडे, अजय चोथमल,अनिल तायडे,चंद्रकांत गायकवाड, संदीप कांबळे, राहुल जुमडे, सागर अंभोरे, ज्ञानेश्वर वरघट, गौतम भगत,नागसेन पखाले,राजकुमार पडघान, अनंतकुमार जुमडे, माणिकराव सोनोने, ॲड.संजय इंगोले, प्रकाश चक्रनारायण,गोपाल सुर्वे, सुनिल फुलारी,अनिल कांबळे, महादेव हरणे, नागेश अवचार, प्रदीप सालवणकर, यशवंत हिवराळे, माणिकराव सोनोने, कैलास महाजन, महेंद्र महाजन, नंदकिशोर वैद्य, सुनिल मिसर, शिखरचंद बागरेचा, सुनिल भगत, सुधाकर चौधरी, रितेश देशमुख आदींचा शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. तसेच उत्कृष्ट संचालनाबद्दल सौ.ज्योतीताई इंगळे यांचाही सत्कार करण्यात आला.

प्रारंभी राजकुमार पडघान यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आयोजन समितीचे मार्गदर्शक सुनिल कांबळे यांनी मुकनायक पत्रकार दिनाची स्थापना आणि ४ वर्षाची वाटचाल विषद केली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून बाबासाहेबांची विचारधारा जोपासून नेटाने पत्रकारीता करणार्या ग्रामीण भागातील पत्रकारांचा सत्कार करुन त्यांचे मनोबल उंचाविण्याचे समितीचे ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रमुख मार्गदर्शन करतांना जेष्ठ आंबेडकरी नेते गोपाळराव आटोटे गुरुजी यांनी सांगीतले की, आज आपण संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. मात्र अजुनही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा मंजूर नाही. त्यामुळे देशाच्या कानाकोपर्यात आजही बाबासाहेबांच्या पुतळ्याची व संविधानाची विटंबना केल्या जात आहे. या बाबीवर पत्रकारांनी जागुत राहीले पाहीजे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून बाबासाहेबांच्या पत्रकारीतेचा पैलू नव्या पिढीसमोर मांडला जात आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. बाबासाहेबांच्या पत्रकारीतेचे अनेक पैलू गंगाधर पानतावणे यांनी समोर आणले. बाबासाहेबांचे कार्य हे सर्वच घटकांसााठी उपकारक असून त्याचा सर्वांनी स्विकार केला पाहीजे असे ते शेवटी म्हणाले. तद्वतच आटोटे यांनी आप्पासाहेब जुमडे व गणेश पडघन यांना श्रद्धांजली वाहतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारीतेची आजच्या काळात गरज असल्याचे अधोरेखित केले. जेष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे म्हणाले की, बाबासाहेबांनी पत्रकारांना लिहीण्याचे स्वातंत्र्य दिले. याची जाणीव ठेवून पत्रकारांना आपल्या लेखणीतून वाईटावर आसूड ओढण्याचे काम केले पाहीजे असे सांगीतले.

आपल्या भाषणातून कार्यक्रमाचे अध्यक्ष विनोद तायडे यांनी आज मुकनायकाची गरज आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले की, आजची पत्रकारीता काही ठराविक व्यवस्थेला वाहीलेली आहे. प्रथम हा कार्यक्रम करत असतांना अनेकांनी आमच्यावर टिका केली. मात्र या टिकेला घाबरुन आम्ही थांबलो नाही. पत्रकारीता हे बाबासाहेबांनी दिलेले हत्यार असून पत्रकार आपल्या लेखणीतून क्रांती घडवू शकते.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलतांना जेष्ठ कामगार नेते सागर तायडे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मजूर, कामगार,शेतकरी आदी घटकासाठी केलेल्या कार्याचा लेखाजोखा मांडला.ते म्हणाले की, बाबासाहेबांनी कामगारांना शासन कर्ती जमात बनुन शासन यंत्रणेवर कायम दबाव निर्माण करा हे सांगीतले होते.कामगारां न्याय हक्क व अधिकारासाठी सुरु केलेले मुकनायक हे वृत्तपत्र शोषित समाजाला बोलके करणारे होते.या वृत्तपत्रातून त्यांनी विविध घटकाच्या समस्या प्राधान्याने मांडल्या. बॅरीस्टर झाल्यानंतर त्यांनी प्रथमच सफाई कामगारांसाठी म्युनिसिपल कामगार संघ या युनियनची स्थापना केली. होती .१२ व १३ फेब्रुवारी १९३८ ला रेल्वे कामगारांची दोन दिवसीय परिषद घेतली होती. तेव्हा त्यांनी जातीची संघटना काढली म्हणून खुप टीका झाली होती. तेव्हा कामगारांची राष्ट्रीय पातळीवर ट्रेड युनियन असावी म्हणून स्वतंत्र मजदुर युनियन ची संकलपणा मांडली होती. हे सर्व सत्य असले तरी मात्र बाबासाहेबांकडून आपण काय शिकलो? याचा विचार केला पाहीजे. इमारत बांधकाम कामगार,गोदी कामगार, विटभट्टी कामगारांच्या समस्येवर त्यांनी अनेक प्रबंध लिहून पार्लमेंटमध्ये सादर केले.जेष्ठ पत्रकार माधव गडकरी यांनी लोकसत्ता मधील मार्मिक या सदरात लेख लिहील्यानंतर नामांतराची चळवळ सुरु झाली. इतकी ताकद पत्रकारीतेत आहे.आजही ९३ टक्के कामगारांची शासनदरबारी नोंदच नाही. कामगारांसाठी आलेला निधी आचारसंहितेच्या नावाखाली रोखून धरण्यात आली आहे. बाबासाहेबांनी गोलमेज परिषदेत कामगारांच्या समस्या मांडल्या. घरकामगार,नाका कामगार,शेतमजूर, गिरणी कामगारांसाठी त्यांनी मोठा लढा दिला.सर्वांना मोफत शिक्षण मिळावे हा बाबासाहेबांचा आग्रह होता. त्यासाठी त्यांनी मराठवाडयातील दुर्गम भागात शिक्षण संस्था काढल्या. एक जात एका धर्मासाठी त्यांनी कधीही कार्य केले नाही. त्यांचे कार्य सर्वसमावेशक होते. पत्रकार ही मोठी शक्ती आहे. पत्रकार अधिकार्यांना प्रश्न विचारु शकतो. मात्र समाजाला जागृत करायचे असेल तर पत्रकारीतेच्या माध्यमातून प्रबोधन केल्याशिवाय परिवर्तन होणार नाही. त्यांनी काढलेले मुकनायक हे वृत्तपत्र प्रेरणादायी व लक्षवेधी होते असे ते शेवटी म्हणाले. उपस्थितांचे आभार पप्पु घुगे यांनी मानले. कार्यक्रमाला जिल्हाभरातून विविध वृत्तपत्रांचे, वृत्तवाहिन्यांचे व सोशल माध्यमांचे पत्रकार बहूसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी स्वागताध्यक्ष अनिल ताजने, आयोजन समिती मार्गदर्शक बबनराव खिल्लारे, सुनिल कांबळे, सुधाकर पखाले, राजाभाऊ इंगोले, आयोजन समिती अध्यक्ष विनोद तायडे, उपाध्यक्ष संतोष वानखडे, माणिकराव डेरे, रवी अंभोरे, विनोद डेरे, बंडू इंगोले, किरण पखाले, कार्याध्यक्ष पप्पू घुगे, सचिव राजकुमार पडघान, कोषाध्यक्ष संदीप डोंगरे, प्रसिद्धीप्रमुख ज्योती इंगळे, सदस्य अजय ढवळे, संजय खडसे, भारत कांबळे, नाना देवळे, श्रीकृष्ण खिल्लारे, संतोष कांबळे, नागेश अवचार, पूजा बनसोड, किरण पडघाण आदींनी अथक परिश्रम घेतले. शेवटी सहभोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# केज येथील पत्रकार बांधवांच्या वतीने 'मूकनायक' दिन साजरा

केज/प्रतिनिधी केज येथील पत्रकार बांधवांच्या वतीने मूकनायक दिन साजरा करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वंचित बहुजन आघाडीचे लिंबराज गायकवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून ऑल इंडिया पँथर सेनेचे केज तालुकाध्यक्ष समाधान बुचुटे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या व पत्रकार बांधवांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून धूपदीपाने पूजन करून वंदन करण्यात आले. यावेळी जेष्ठ पत्रकार रामदास तपसे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, ३१ जानेवारी १९२० रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक'या पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. हे पाक्षिक मुंबईहून निघत असे. पांडुरंग नंदराम भटकर नावाच्या सुशिक्षित तरुणाने या पाक्षिकाचे संपादन केले. पहिल्या अंकातील 'मनोगत'नावाचा अग्रलेख हा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः लिहिला होता. त्यावेळी मूकनायकासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी २ हजार ५०० रुपयाची



आर्थिक मदत दिली. पुढे बोलताना तपसे म्हणाले की, सर्व पत्रकार बांधवांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पत्रकारिता करावी. वंचित, पीडित घटकातील व बहुजनांना पत्रकारितेच्या माध्यमातून न्याय देण्याचे प्रामाणिक काम करावे असे बोलताना त्यांनी स्पष्ट केले आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी व पत्रकार बांधवांनी आपले मनोगत व्यक्त करून मूकनायक दिनाचे महत्त्व सांगितले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी लिंबराज गायकवाड म्हणाले की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पहिले पाक्षिक काढले या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यावेळेस पत्रकारितेस सुरुवात केली. म्हणूनच तेव्हापासून ते आज पर्यंत पत्रकारितेच्या माध्यमातून दिन दलितांच्या व बहुजनांच्या अन्यावर आवाज उठवण्याचे काम पत्रकार बांधव करत आहेत. पुढे बोलताना गायकवाड म्हणाले की, नागरिकांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात पत्रकार हे आवाज उठतात म्हणून लोकशाही जिवंत आहे. मूकनायक दिनानिमित्त गायकवाड यांनी सर्व पत्रकार बांधवांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक पत्रकार वसंत सोनवणे यांनी केले तर उपस्थितांचे आभार जेष्ठ पत्रकार मुबाशीर खतीब यांनी मानले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे लिंबराज गायकवाड, ऑल इंडिया पँथर सेनेचे समाधान बचुटे, ज्येष्ठ पत्रकार अशोक नागरगोजे, रामदास तपसे, मुबाशीर खतीब, वसंत सोनवणे, तात्या गवळी, संजय खळगे यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

# थंडी गायब!, फेब्रुवारीपासूनच उन्हाच्या झळा?

मुंबई : प्रतिनिधी –भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्रसह संपूर्ण भारतभरात फेब्रुवारी महिन्यातील कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. उत्तर भारतातील थंडीच्या दिवसांची संख्या सरासरीपेक्षा कमी राहण्याचा, तसेच पर्जन्यवृष्टी आणि बर्फवृष्टीही सरासरीपेक्षा कमी होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार देशभरात फेब्रुवारी कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. प्रामुख्याने महाराष्ट्रात मुंबईसह संपूर्ण किनारपट्टी, उत्तर महाराष्ट्र आणि मध्य महाराष्ट्रात तापमान सरासरीपेक्षा जास्त राहून उन्हाच्या झळा जाणवण्याचा अंदाज आहे. उत्तर महाराष्ट्रात चार–पाच दिवस थंडीची लाट सदृशस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. प्रशांत महासागरात ला निना सक्रीय आहे पण कमजोर स्थितीत आहे. एप्रिलअखेरपर्यंत तो सक्रीय राहून त्यानंतर तो तटस्थ अवस्थेत जाईल, असेही हवामान विभागाने म्हटले आहे.

जानेवारी महिन्यात देशाचे सरासरी कमाल तापमान २४.६१ अंश सेल्सिअस असते. यंदाच्या जानेवारीत २५.४५ अंश सेल्सिअस होते. कमाल तापमान सरासरी ११.४६ अंश सेल्सिअस असते, ते १२.५१ अंश सेल्सिअस होते. जानेवारी महिन्यात कमाल तापमान सरासरीपेक्षा ०.८५ अंश सेल्सिअसने जास्त होते तर कमाल तापमान १.०५ अंश सेल्सिअसने जास्त होते. १९०१ ते २०२५ या काळातील नोंदीनुसार यंदाचा जानेवारी पाचव्या क्रमांकाचा उष्ण महिना ठरला आहे. १९११ च्या जानेवारीत आजवरच्या उच्चांकी १२.६८ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली होती.

हवामान विभागाने फेब्रुवारी महिन्यात तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज व्यक्त केला असला तरीही राज्यातील थंडी संपली असे म्हणता येणार नाही. फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरावड्यात उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्रात थंडीचे काही दिवस असू शकतील, अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी दिली.

गहू, फळबागांना फटका?

देशभरात फेब्रुवारी महिन्यात पाऊस सरासरीपेक्षा कमी पडण्याचा अंदाज आहे. दुसरीकडे तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. प्रामुख्याने गहू उत्पादनाचा प्रमुख पट्टा असलेला पंजाब, हरियाणा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्येही तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या दीक्षांत समारंभामध्ये महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



लातूर –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे नुकताच संपन्न झालेल्या दीक्षांत समारंभामध्ये महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागातील साक्षी सूर्यवंशी हिला एम.ए. तत्त्वज्ञान विषयात विद्यापीठात सर्व प्रथम आल्याबद्दल तसेच समाजशास्त्र विभागातील एम.ए. द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी कु. माने पूजा विद्यापीठांमध्ये मुलींमधून सर्वप्रथम आल्याबद्दल तसेच आंतर विद्यापीठिय क्रीडा स्पर्धेत विशेष प्राविण्य प्राप्त केल्याबद्दल ऋषभ वाघ खो– खो ,सागर गायकवाड खो– खो, ज्ञानेश्वर महानवर– कुस्ती या क्रीडा प्रकारात विशेष प्राविण्य प्राप्त केल्याबद्दल तसेच राष्ट्रीय युवक महोत्सवात लोकसंगीत या कलाप्रकारात सर्व द्वितीय पारितोषिक प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयाचे विद्यार्थी गणेश शिंदे व कैवल्य पांचाळ आदि सर्व विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह तसेच सन्मानपत्र देवून कुलगुरु डॉ. मनोहर चासकर याच्या हस्ते सुवर्ण पदक देवून सत्कार करण्यात आला, यावेळी विचारमंचावर विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष, कार्यकारी संचालक आणि सर्व संचालक, प्राचार्य डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, पदव्युत्तर विभागप्रमुख डॉ. यशवंत वळवी, तत्त्वज्ञान व समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. शितळ येरुळे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# जनविकास परिवर्तन विकास आघाडीच्या आयोजित हाळदी कुंकूवाच्या कार्यक्रमास सहभागी महिलांचे हारुणभाई इनामदार यांनी मानले आभार.

केज/प्रतिनिधी जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने हळदी कुंकू महोत्सवास शनिवारपासून प्रारंभ करण्यात आला आहे, या महोत्सवाला शहरातील महिलांनी उदंड प्रतिसाद दिला आहे.याही पुढे जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी महिलांसाठी विविध उपक्रम घ्यावेत अशा प्रतिक्रिया कार्यक्रमातून महिला वर्गातून उपस्थित केल्या जात आहेत. हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांचे कौतुक देखील महिला करत आहेत. शहरातील महिलांनी या कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांनी केले होते. या आवाहनाला महिलाकडून उदंड प्रतिसाद मिळाला आहे. भावाच्या हाकेला बहिणींनी ओ देऊन चार हजार बहिणींनी हळदी कुंकवाच्या कार्यक्रमात सहभाग नोंदवून कार्यक्रमाचा आनंद घेतला अशी प्रतिक्रिया इनामदार यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे. नगरपंचायत च्या माध्यमातून केज शहराचा विकास करत असताना व शहरातील जनता नगरपंचायतच्या कामकाजावर खुश असताना काही विघ्न संतोषी मंडळींनी फेसबुकवर पोस्ट टाकली, व भ्राष्टाचाराचे बिन बुडाचे आरोप केले परंतु आम्ही या पोस्टची दखल घेण्या एवढे मोठे नाहित परंतु आम्ही चांगले काम करत असताना आमची नाहक बदनामी करत राहिल्यास त्याविरोधात कोर्टात अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार असल्याचे नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी मध्यम अशी बोलताना पष्ट केले आहे.



गेले पाच ते सहा वर्षापासून जनविकास परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून व हारुणभाई इनामदार यांच्या संकल्पनेतून केज शहरांमध्ये नारी महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये महिलांसाठी हळदीकुंकवाचा कार्यक्रम, उखाण्याचा कार्यक्रम, महिलांना जनविकास परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून एक वस्तू चांगली भेट म्हणून देण्यात येत आहे. त्याचबरोबर अल्पोपहाराचीव्यवस्थादेखीलकरण्यातयेते. हळदी कुंकू महोत्सवाच्या माध्यमातून महिला एकत्र येत विचाराची देवाणघेवाण करून एकमेकाशी हितगुज साधत असल्यामुळे या कार्यक्रमावर महिला खुश असल्याच्या प्रतिक्रिया देत आहेत महिला घर काम, व्यवसाय, नोकरी सह इतर कामात वर्षभर व्यस्त असतात त्यामुळे महिलांना एकमेकीशी संवाद साधता येत नाही. या जनविकास परिवर्तन आघाडीच्या हार्दिक महोत्सवाच्या माध्यमातून त्यांना हितगुज साधून एकमेकींच्या विचाराची देवाणघेवाण करण्याची संधी उपलब्ध होते त्यामुळे महिलावर्ग खुश असल्याच्या भावना त्यांच्यातून पाहावयास मिळाल्या आहेत.

# आ.नमितताई मुंदडा यांच्या माध्यमातून तून आज पर्यंत चिंचोली (माळी)ला १ कोटी पेक्षा जास्त निधी–सुनिल गलांडेपाटील



केज/प्रतिनिधी केज विधान सभेच्या आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या माध्यमातून चिंचोलीमाळी येथे तीर्थक्षेत्र विकास योजनेतून , उर्दू शाळेला २ वर्गखोल्या, विविध भागातील सिमेंट रस्ते व सभागृह या साठी आता पर्यंत एक कोटी पेक्षा जास्त रुपयाचा निधी त्यांनी चिंचोली माळी गावासाठी दिला असून त्यांच्याच माध्यमातून महादेव मंदिरासमोर सात लाख रुपयाच्या सभागृहाचे भूमिपूजन भाजपाचे जेष्ठ नेते सुनिल गलांडेपाटील यांचे हस्ते शुक्रवारी सकाळी ११–०० वाजता करण्यात आले. यावेळी त्यांनी आ नमिताताई अक्षय मुंदडा, व भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर काका मुंदडा यांचे आभार मानून त्यांना धन्यवाद दिले. यावेळी बोलताना सुनील आबा गलांडे पाटील म्हणाले की, आज पर्यंत आ.नमिताताई मुंदडा यांच्या विकास निधीतून तीर्थ क्षेत्र विकास निधीतून श्री संत नामदेव महाराज मंदिरासमोरील सभागृह, मुस्लिम समाजाच्या विध्यार्थ्यांसाठी उर्दू शाळेच्या २ वर्ग खोल्याचे बांधकाम, दलित वस्ती सह विविध भागातील सिमेंट रस्ते, काळे वस्तीवरील मुंजाबा मंदिरासमोर सभागृह आणि महादेव मंदिरा समोरील सभागृहासाठी सात लाख रुपयाचा निधी असा एकूण १ कोटी पेक्षा जास्त विकास निधी चिंचोलीमाळी च्या विकासासाठी आ. नमिताताई मुंदडा यांनी दिला आहे. शुक्रवारी सकाळी १०–०० वाजता महादेव मंदिरासमोरील सभागृहाचे भूमिपूजन भाजपाचे जेष्ठ नेते सुनिल गलांडेपाटील यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी चिंचोलीमाळी च्या विकासासाठी भरघोष निधी दिल्याबद्दल तसेच चिंचोली माळी –सारुकवाडी– डोका,– हादगाव – लाखा हा रोड खराब झाल्यामुळे या रस्त्याच्या सिमेंट रोड साठी १२ कोटी रुपये निधी आमदार नमीताताई मुंदडा यांच्या माध्यमातून उपलब्ध झाला असून त्याचे टेंडर झाले आहे लवकरच या रोडचे उद्घाटन करण्यात येणार आहे.लाईटचा प्रश्न असो,दवाखान्याचे काम असो आ.नमिताताई मुंदडा व भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर काकाजी मुंदडा हे गोरगरीब सामान्य माणसाला सतत मदत करत असतात. म्हणून आ नमिताताई अक्षयजी मुंदडा व जेष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा काकाजी यांचे आभार मानून त्यांना धन्यवाद दिले. या प्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते सुनीलआबा गलांडे पाटील, चेअरमन अरुण तात्या काळे, उपसरपंच धीरज वनवे, ग्रामपंचायत सदस्य, अशोक शिंदे, ग्रामपंचायत सदस्य माणिक गालफाडे, दिपक शिंदे, दगडु दळवे, दिलीप गायकवाड, चंद्रकांत भुजबळ, रविंद्र गलांडे तर मधुकर निंगुळे, सुनील नखाते, सुरज सारुक, अशोक राऊत, दत्ता काळे, मनोज गालफाडे,राजाभाऊ नखाते, संदिप राऊत, विष्णू काळे, जालिंदर गलांडे,राजा सुतार, संजय शिंदे, अवधूत माने,गोरख काळे, ज्ञानोबा घोडके,चांद सय्यद,दत्तु नखाते,नाना नेमट,मोहन नखाते, नंदकुमार घुंबरे, सुनील नखाते,चंद्रकांत पवार,जनार्दन केंद्र,बिभीषण गायकवाड,चंद्रकांत घोडके, कृष्णा पवार,संदिप शिंदे, श्रीकृष्ण मगर,अनिल शिंदे, भगवान हुंबे,जितेंद्र शिंदे, महादेव नखाते,मोहन नखाते, प्रल्हाद सोळंके,अशोक पवार, आबा गलांडे,संदिप राऊत, श्रीकांत शिंदे,रामेश्वर चिंचोलकर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जनावरांच्या बाजारातील प्रस्तावित कांदा-बटाटा मार्केट व मुलांच्या वस्तीगृहाची माजी मंत्री आ.अमित देशमुख यांच्याकडून पाहणी संबंधितांना केल्या आवश्यक सूचना



लातूर / प्रतिनिधी :– राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण,सांस्कृतिक कार्य मंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. ३१ जानेवारी रोजी दुपारी लातूर शहरातील महात्मा बसवेश्वर चौक परिसरात असलेल्या जनावरांच्या बाजारातील प्रस्तावित कांदा व बटाटा मार्केट स्थळ, तसेच जुने भाजी मार्केट जवळील यशवंतराव चव्हाण ग्रामीण विद्यार्थी मुलांचे वस्तीगृह, सचिव निवासस्थान जागाची पाहणी करून संबंधितांना आवश्यक सूचना केल्या. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, प्रभारी सचिव अरविंद पाटील, सहसचिव सतीश भोसले, संचालक सर्वश्री बालाप्रसाद बीदादा, सुधीर गोजमगुंडे, सुभाष घोडके, शिवाजी देशमुख, बळवंत पाटील, बालाजी वाघमारे, अनिल पाटील, युवराज जाधव, शिवाजी कांबळे, आनंद पवार, आनंद पाटील, लक्ष्मण पाटील, श्रीनिवास शेळके, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, विलास को–ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन रवींद्र काळे, राजकुमार पाटील, बी.एस पवार, गणेश एस.आर.देशमुख, गोविंद डुरे पाटील, आदिसह कृषी उत्पन्न बाजार समितीचे विविध पदाधिकारी, संबंधित अधिकारी उपस्थित होते. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मार्केटिंग फेडरेशन, सोयाबीन खरेदी केंद्र, जनावरांचा बाजार लातूरला भेट देऊन व्यवस्थापक अशोक चिद्रे यांच्याकडून सोयाबीन हमीभाव, आवक आदिची माहिती घेऊन बारदाना मुबलक प्रमाणात ठेवावा, मनुष्यबळ वाढवून शेतकऱ्यांचे वाहन लवकरात लवकर खाली करावे अशा सूचना केल्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE